दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगड नगरी

www.raigadnagari.com
/ raigadnagari

वर्ष २० वे | अंक २५२ | MAHMAR/2006/17212 | रायगड | बुधवार, दि.१० डिसेंबर २०२५ | किंमत १ ₹ | पृष्ठे ४ | रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

## म्हसळा तालुक्यात अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

तालुक्यातील देवघर परिसरात अल्पवयीन मुलीवर धमकी देत लैंगिक अत्याचार करण्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे.इंस्टाग्रामवरून परिचय वाढवत मुरुड येथील आरोपीने मुलीचे घरापर्यंत संपर्क साधत सोबत आली नाहीस तर तुझ्या आईचा जीव घेईन अशी धमकी देऊन मुलीवर मानसिक दबाव टाकला.भीतीच्या छायेत मुलीला जबरदस्ती फिरायला नेण्यात आले.मुलीने सातत्याने नकार दिल्यानंतरही आरोपीने नाही आलीस तर तुलाही मारून टाकीन धमकी देत तिला सोबत घेऊन जंगल भागात लैंगिक अत्याचार केला.सायंकाळी मुलगी घरी परतल्यावर आईने विचारपूस केली असता तिने घडलेली घटना आईला सांगितली. त्यानंतर मुलीच्या आई-वडिलांनी क्षणाचाही विलंब न करता म्हसळा पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली. तक्रार मिळताच पोलिसांनी अत्यंत वेगाने कारवाई करत अवघ्या दोन तासांत आरोपीला ताब्यात घेऊन बेड्या ठोकल्या.या प्रकरणी आरोपीवर पोस्को कायदा कलम ४,६,८,१२ तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ६४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नागावमध्ये बिबट्याचा कहर : पाच जणांवर हल्ला

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग तालुक्यात बिबट्याच्या दर्शनाने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नागाव येथील नागरी वस्तीमध्ये आज सकाळी बिबट्या दिसल्याने ग्रामस्थांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याने दोन जणांवर हल्ला करून त्यांना जखमी केल्यानंतर दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास रेस्क्यू टीम मधील अन्य तिघा जणांना त्याने जखमी केले आहे. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी आणि पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. परिसरातील एका वाडीत बिबट्या लपून असल्याचे समोर आल्यानंतर वनविभागाकडून त्याला सुरक्षितपणे पकडण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. नागरीकांनी घराबाहेर अनावश्यक हालचाल टाळावी, सुरक्षित ठिकाणी राहावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण असले तरी परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी



प्रशासन पूर्णपणे सतर्क आहे. नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर यांनी नागरिकांना अफवा न पसरवता वनविभागाला सहकार्य करण्याचे तसेच अनावश्यक गर्दी न करण्याचे आवाहन केले आहे. बिबट्याच्या उपस्थितीमुळे परिसरात तणाव असला, तरी वनविभाग आणि पोलिसांचे पथक संयुक्तरीत्या मोहिम राबवत असल्याने परिस्थिती लवकरच सामान्य होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## भविष्यात बिबट्यांच्या हल्ल्यात एकही मृत्यू होणार नाही यासाठी यंत्रणा सतर्क : वन मंत्री गणेश नाईक

**दै.रायगड नगरी । वृत्तसंस्था**

**नागपूर ।** राज्यातील मानव वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी वन विभागाकडून ठोस उपाययोजना करण्यात येत आहेत. भविष्यात एकही मनुष्य मृत्यूमुखी पडणार नाही, यासाठी यंत्रणा सतर्क केली आहे. यासंदर्भात लोकप्रतिनिधींची बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत दिली.



राज्यातील बिबट्यांच्या हल्ल्यासंदर्भातील लक्षवेधीवर उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी सदस्य डॉ. जितेंद्र आव्हाड, अतुल भातखळकर, सुनील प्रभु आदींनी ही लक्षवेधी सूचना मांडली होती.

वनमंत्री नाईक म्हणाले की, पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यात बिबट्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. बिबट्या हा प्राणी केंद्रीय वन्यजीव संरक्षण कायद्याच्या शेड्यूल एक मध्ये असल्याने कार्यवाही करण्यात मर्यादा आहेत. त्यामुळे बिबट्याचा समावेश शेड्यूल एक मधून शेड्यूल दोन मध्ये करण्याची विनंती केंद्र शासनाकडे केली आहे. त्याबरोबर केंद्रीय वन विभागाने राज्यातील पाच बिबट्यांच्या नसबंदीची परवानगी दिली असून याबाबतची कार्यवाही सुरू झाली आहे. सहा महिन्यात त्याचा अहवाल आल्यानंतर आणखी बिबट्यांच्या नसबंदीचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्यात येईल.

पुणे जिल्ह्यात जुन्नर येथे बिबट्यांसाठी बचाव केंद्र सुरू करण्यात आले असून त्याची क्षमता वाढविण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. याशिवाय अहिल्यानगर मध्येही बचाव केंद्र सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पुणे जिल्ह्यात १२०० पिंजरे देण्यात आले असून नाशिक व अहिल्यानगरमध्येही पिंजरे देण्यात आले आहेत. भविष्यात आणखी पिंजरे वाढविण्यात येतील. तसेच लोकप्रतिनिधींनी मागणी केल्यास तातडीने पिंजरे पुरविण्याच्या सूचना विभागास देण्यात आले आहेत. तसेच बिबट्यांवर लक्ष ठेवून त्याच्या हालचालींची माहिती ग्रामस्थांना देण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून यंत्रणा उभी करण्यात आली आहे. बिबट्यांचा वावर असलेल्या परिसरातील शाळांची वेळ बदलण्यात आल्याची माहितीही मंत्री नाईक यांनी यावेळी दिली.

बिबट्यांचा वावर असलेल्या ठिकाणी गस्त घालण्यासाठी गृह, वन व महसूल विभागाची पथके तयार करण्यात आली आहेत. यामध्ये स्थानिक तरुणांना सहभागी करून घेण्याचा विचार करण्यात येत आहे. जंगलातच वन्य जीवांना खाद्य मिळावे, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. जंगलाच्या सीमेवर बांबूचे कुंपण लावण्याचे नियोजन आहे. या प्रश्नांवर सर्व लोकप्रतिनीधी, वन व महसूल विभागाचे अधिकारी यांची संयुक्त बैठक घेऊन सर्व प्रश्न सोडविण्यात येतील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

बिबट्याच्या हल्ल्यासंदर्भात अधिवेशन काळात लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांची महसूल विभागनिहाय बैठका घेऊन मार्ग काढण्याची विनंती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी केली.या चर्चेत सदस्य डॉ.जितेंद्र आव्हाड, नाना पटोले, शरद सोनवणे, अब्दुल सत्तार, कृष्णा खोपडे यांच्यासह विविध सदस्यांनी सहभाग घेतला.

## शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात गुटखा विक्री तात्काळ बंद करावी ; आ.प्रशांत ठाकूर यांची हिवाळी अधिवेशनात मागणी

## कडक कारवाईचे निर्देश; वेळ पडल्यास कायद्यात काही बदल करणार : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । पनवेल**



महाराष्ट्रातील अनेक शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात गुटखा तसेच अमली पदार्थांची विक्री वाढत असल्याच्या गंभीर तक्रारी समोर येत आहेत. नियमांनुसार कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या १०० मीटर परिसरात अशा पदार्थांची विक्री संपूर्णपणे बंदीस्त आहे. मात्र, अनेक ठिकाणी टपऱ्या आणि स्टॉल्सद्वारे या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले असून आमदार प्रशांत ठाकूर यांनी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात गुटखा विक्री तात्काळ बंद करावी अशी मागणी करतानाच विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली.

तारांकित प्रश्नाद्वारे गुटखा व अंमली पदार्थ विक्रीचा गंभीर प्रश्न आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केला होता. या प्रश्नाच्या अनुषंगाने विधिमंडळाच्या सभागृहात आमदार प्रशांत ठाकूर यांनी सदरचा विषय मांडत शासनाचे लक्ष या प्रश्नाकडे वेधले. महाराष्ट्रात शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात गुटखा त्याचबरोबरीने अमली पदार्थांची विक्री वाढत असल्याची गंभीर तक्रार पुढे आली आहे. शासनाच्या नियमांनुसार शैक्षणिक संस्थांच्या परिसरात अशा पदार्थांची विक्री पूर्णपणे बंदीस्त आहे. तरीही अनेक ठिकाणी टपऱ्या आणि स्टॉल्स निर्बंधांचा भंग करत सुरू असल्याचे स्थानिक नागरिकांनी निदर्शनास आणले आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आणि त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने तातडीची उपाययोजना करण्याची मागणी नागरिक, सामाजिक संघटना आणि पालकांनी प्रशासनाकडे केली आहे. सदरच्या प्रश्नावर बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हंटले कि, गुटखा आणि अंमली पदार्थाची विक्री विद्यालयांच्या परिसरातील टपरी दुकानांवर सर्रासपणे होत असल्याची तक्रारी संपूर्ण महाराष्ट्रातून येत आहेत. या प्रश्नाच्या अनुषंगाने लेखी उत्तरात शाळा महाविद्यालय १०० मीटर परिसरामध्ये गुटखा तंबाखू सिगारेट विक्री करणाऱ्या टपरी, जनरल स्टोअर्स, किराणा दुकान यांचे अतिक्रमण काढण्याकरिता स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यासोबत पोलीस ठाणे प्रभारी यांनी पत्रव्यवहार करावा आणि संयुक्त कारवाई पथक नियुक्त करण्यात आलेली आहेत, अशी माहिती शासनाकडून देण्यात आली आहे. मात्र जर अशी पथके नियुक्त करण्यात आली आहेत तर लोकप्रतिनिधींना त्याची माहिती मिळाली नाही. त्यामुळे प्रत्यक्षरित्या हा आदेश झाला असेल तर त्याची अमंलबजावणी कधी होणार आणि असे पथक नियुक्त केले असेल तर त्याची माहिती अधिकार फलकाप्रमाणे शाळा महाविद्यालयाच्या परिसरामध्ये लावण्याची आवश्यकता आहे आणि तक्रार केल्यानंतरही गुटखा अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या टपऱ्या दुकानांना हटवले जाणार नसेल तर त्या पथकाला जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, अशीही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात बोलताना केली. आणि या सर्व बाबीतून गुटखा व अंमली पदार्थ विक्रीचा महत्वपूर्ण विषय राज्य शासन दरबारी मांडून शासनाचे लक्ष केंद्रित केले.

गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी उत्तर देताना सभागृहात सांगितले कि, गुटख्यावर बंदी असतानाही काही ठिकाणी अवैध विक्री होते. त्या संदर्भात पोलिसांनी महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई केली त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा घेतला आणि त्यानुसार गुटखा विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार शाळा महाविद्यालयांच्या परिसरातील पोलीस प्रशासनाने या टपरी दुकाने उध्वस्त करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेला कारवाई करण्याचे निर्देश दिले आहे. त्याचबरोबर या संदर्भात लोकप्रतिनिधींना माहिती देण्याकरिता तातडीने त्यांच्या ठिकाणच्या पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षकांना निर्देश देऊन तशी माहिती देण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात बोलताना, गुटखा विक्रीवर कडक कारवाई झाली पाहिजे त्यासाठी निर्देश दिले असल्याचे सांगून त्या अनुषंगाने कारवाई करण्यासंदर्भात कायद्यात काही बदल करावे लागले तरी ते केले जातील, असे आश्वासित केले.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे पनवेल परिसरातील वाहतूक आणि दळणवळण बदलणार



**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर पनवेल परिसरातील वाहतूक आणि दळणवळण व्यवस्था पूर्णपणे बदलणारे महत्त्वाकांक्षी प्रकल्प वेगाने पूर्णत्वाकडे जात आहेत. यात विमानतळाच्या पूर्व प्रवेशद्वारासाठी तयार होणारा 'ईस्टर्न एंट्री इंटरचेंज' प्रकल्प अंतिम टप्प्यात पोहोचला असून, येत्या सहा महिन्यांत हा मार्ग वाहतुकीसाठी सुरू होण्याची शक्यता आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या ८०० कोटी रुपयांच्या निधीतून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ या प्रकल्पाचे काम करत आहे. 'क्लोव्हर लीप' इंटरचेंजमुळे पनवेल शहर, खांदेश्वर रेल्वे स्थानक परिसर आणि जेएनपीटी बंदरातून येणाऱ्या कंटेनर वाहतुकीला मोठा दिलासा मिळणार आहे. या प्रकल्पामध्ये फुलपाखराच्या आकाराचा विना-सिग्नल उड्डाणपूल आणि जोडरस्त्यांचे मोठे जाळे तयार केले जात आहे. या उड्डाणपुलामुळे गाढी नदीवरील खाडीमार्ग ओलांडून कंटेनर थेट विमानतळाच्या कार्गो प्रवेशद्वारापर्यंत विना-अडथळा पोहोचू शकतील, अशी या मार्गाची रचना करण्यात आली आहे. ईस्टर्न इंटरचेंजच्या धर्तीवर विमानतळाच्या उलवा बाजूस वेस्टर्न एंट्री इंटरचेंज या प्रकल्पाचे कामही सुरू आहे. या इंटरचेंजमुळे अटल सेतूवरून मुंबईच्या दिशेने आलेल्या वाहनांना थेट विमानतळ गाठणे शक्य होणार आहे. उड्डाणपूल, गोलाकार चौक आणि उंच मार्गांच्या जाळ्यामुळे नवी मुंबई आणि पनवेलचा विमानतळाशी अखंडित संपर्क साधला जाणार आहे. ही पायाभूत सुविधा पनवेल शहराच्या विकासाला मोठी गती देणारी ठरणार आहे. या प्रकल्पामुळे पनवेल शहरातील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. सायन-पनवेल महामार्ग, मुंबई-गोवा महामार्ग आणि अटल सेतू-पामबीच मार्गावरून येणाऱ्या प्रवाशांना विमानतळापर्यंत थेट पोहचता येणार आहे. कळंबोली सर्कल, खांदेश्वर तसेच पनवेल शहर या परिसरातील वाहनचालकांना या मार्गाचा सर्वाधिक लाभ मिळणार आहे.

## पोलादपूर ते महाडदरम्यान मुंबई ते गोवा महामार्ग होतोय पट्टेरी ; तीन पदरी पुलावरची वाहतूक एकेरी



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

महाड ते पोलादपूरदरम्यान मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावर पांढरे पट्टे रेखाटण्यावे काम गेल्या काही दिवसांपासून प्रगतीपथावर आहे. यादरम्यान चांढवे ते पार्ले, लोहारे या तीन पदरी पुलांवरील वाहतूक अचानक एकेरी सुरू झाल्याचे दिसून येत आहे. मात्र, या पुलांवरील तडे गेलेल्या काँक्रीटीकरणाकडे महामार्ग बांधकाम विभागाकडून सपशेल दूर्लक्ष केले जात आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर चांढवे ते पार्ले दरम्यान ओव्हरब्रिजनंतर टोलनाका असून त्यापुढे लोहारेपर्यंत तीन पदरी रूंदीचे तीन ओव्हरब्रिज आहेत. गेल्या १५ दिवसांपासून या महामार्गावर पांढरे पट्टे रेखाटण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या कामादरम्यान, किमान ५०० मीटर आधी वाहन चालकांना पुढे एकेरी पदरावरून वाहतुक सुरू करण्यात आल्याचे कोणतेही सूचना फलक न लावताच ज्या ठिकाणी पट्टे रंगविण्याचे काम सुरू आहे; त्याठिकाणी लाल रंगाचे बॅरीकेटस् उभारून तसेच एक केशरी रंगाचा इंडिकेटर लॅम्प लावून अचानक एकेरी मार्गिका दिसून वाहनचालकांची त्या एकेरी पदरावरून वाहन नेताना तारांबळ उडत असल्याचे दृश्य दिवसांतून अनेकदा दिसून येत आहे.

काही वेळा या लाल रंगाच्या फायबरच्या बॅरिकेटसना वाहनांचा धक्का लागून ते उडविले जात आहेत. चांढवे टोलनाक्यापुढील मुंबई आणि गोव्याकडे जाणाऱ्या दोन्ही तीन पदरी ओव्हरब्रिजवर पांढरे पट्टे रंगविण्याच्या कामामुळे दोन्ही ओव्हरब्रिजवर एकाच मार्गिकेवरून वाहतूक तीन पदरांवरील वाहने अरूंद मार्गिकेवर जाण्यासाठी झुंबड उडाल्यासारखी परिस्थिती अपघाताला निमंत्रण देणारी ठरण्याची शक्यता आहे. या ओव्हरब्रिजवर अनेक दुचाकीस्वारांचे अपघात झाले असून अनेकांना जीवदेखील गमवावे लागले आहेत.

चारही ओव्हरब्रिजवरील काँक्रीटच्या रस्त्यांना एक ते दोन इंच रूंदीचे सुमारे दोन ते चार मीटर लांबीचे तडे गेले असल्याकडे दूर्लक्ष करून पांढरे पट्टे रंगविण्याच्या कामाला प्राधान्य दिले जात असल्याने स्थानिक नागरिकांना पांढरे पट्टे रंगविल्यानंतर काँक्रीटच्या रस्त्याचे तडे गेलेल्या भागातील कप्पे काढून नव्याने काँक्रीटीकरण करून पुन्हा पांढरे पट्टे रंगविण्याचा दुबार खर्च संबंधित महामार्ग बांधकाम विभागाकडून केला जाईल, अशी उपहासात्मक चर्चा होत आहे.

# उरण वाहतूक पोलीसांकडून विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षा धडे

**दै.रायगड नगरी । उरण**

परंपरेने वाहणाऱ्या शिस्तीच्या धारेत नवा उजेड टाकत, उरण वाहतूक शाखेने वेशवी येथील प्राथमिक शाळेतील लहानग्यांना रस्ते सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. भविष्याची पावले सुरक्षित रहावीत, यासाठी पोलीस प्रशासनाने ज्ञानाचा हा सुंदर दिवा पेटवला.

कार्यक्रमात रस्ता ओलांडताना डावीकडे-उजवीकडे पाहण्याचे महत्त्व, झेब्रा क्रॉसिंगचा योग्य वापर, शाळेच्या बसमध्ये चढताना-उतरताना काळजी घेणे, सायकल चालविताना डावीकडून चालणे, हेल्मेटचे अत्यावश्यक महत्त्व यावर सविस्तर मार्गदर्शन देण्यात आले. मोबाईल किंवा हेडफोन वापरत रस्ता न ओलांडण्यासारख्या आधुनिक काळातील धोक्यांबाबतही विद्यार्थ्यांना सावध करण्यात आले. अपघात दिसल्यास तत्काळ शिक्षकांना माहिती देणे, तसेच १०० किंवा ११२ वर कळवणे याबाबतही जागरूकता निर्माण करण्यात आली. या प्रबोधन सत्राला सुमारे ४० ते ५० विद्यार्थी व शिक्षक मोठ्या उत्साहाने उपस्थित होते.

हा उपक्रम दिनांक ०९ डिसेंबर २०२५ रोजी पार पडला असून संपूर्ण सत्राचे मार्गदर्शन पोउनि उद्धव सोळंके यांनी उत्साहपूर्ण संयमी शैलीत केले. समाजाच्या उद्याचा पाया असलेल्या या बालकांना सुरक्षिततेचे संस्कार देत उरण वाहतूक पोलिसांनी पुन्हा एकदा संवेदनशीलतेचे उदाहरण घालून दिले.

---

मा.साळवी मॅडम कोर्ट

अर्जदारांचे वकील
श्री. एकनाथ जी. खुटले

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.२रे सहदिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.१४३६/२०२५
ने.ता.०२/०१/२०२६

१) श्रीमती. जयश्री ज्ञानेश्वर म्हात्रे वय ४३ वर्षे,
२) सौ. रोशनी आनन चौधरी वय २६ वर्षे,
रा. शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड.
३) श्री. ऋशीकेश ज्ञानेश्वर म्हात्रे वय २४ वर्षे,
४) श्रीमती. चंद्रभागा सुदाम म्हात्रे वय ७९ वर्षे,
क्र. १, ३ व ४ रा. घर नं. ६४-४, म्हात्रे आळी,
धाकटा खांदा, ता. पनवेल, जि. रायगड. अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै. ज्ञानेश्वर सुदाम म्हात्रे हे दि. २५.०६. २०२५ रोजी निरामय हॉस्पिटल, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे मृत्यु पावले असून, त्यांचा खालील वर्णनाच्या मिळकतीं बाबत वारस दाखला मिळणेकरीता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**जमिनींचे वर्णन**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| पनवेल-३३९ | ५०१ | ३ | ०-०४-० |
| | ५०८ | १ | ०-०४-३ |
| | ५०९ | १ | ०-२१-० |
| | ५३२ | ३ | ०-२५-३ |
| पनवेल-३४० | ५०७ | ४ | ०-०५-८ |
| पनवेल-३४१ | ५४५ | ५ | ०-३०-३ |
| पनवेल-४३१-अ | ७१५ | अ/२ | ०-०१-८ |
| | ७१८ | २ | ०-१६-७ |
| पनवेल-४३१-ब | ४९५ | ३ | ०-०९-१ |
| | ५०२ | १ | ०-०६-६ |
| | ५०६ | २ | ०-०२-५ |
| पनवेल-४३१-फ | ४९८ | ३ | ०-०३-१ |
| पनवेल-४५९ | ६२४ | १३ | ०-०२-५ |

अर्जदार हे कै. ज्ञानेश्वर सुदाम म्हात्रे यांचे कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तिस हरकत घ्यावयाची असल्यास, त्यांनी ही जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहीत मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना. कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर येणाया हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि. ०३/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

---

बोराडे-कपूर सो

अर्जदार तर्फे वकील : ॲड.एच.भगत

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.१४१०/२०२५
नि.नं.६/ड
ने.ता.०५/०१/२०२६

श्रीमती भागूबाई उर्फ भागीबाई कृष्णा टेंभे अर्जदार
विरुद्ध
१) श्री केसरीनाथ रामचंद्र ठाकूर (मयत) तर्फे वारस
१/१) श्रीमती जाईबाई केसरीनाथ ठाकूर, वगैरे सामनेवाले

ज्याअर्थी तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै. श्री रामचंद्र बाळू ठाकूर है तारीख ९/८/१९९० रोजी ठिकाण मौजे रोडपाली, ता. पनवेल, जि. रायगड. येथे मयत झालेले आहेत. त्याचप्रमाणे त्यांची पत्नी श्रीमती जिजाबाई बाळू ठाकूर ह्यादेखील तारीख १६/५/२००५ रोजी ठिकाण-मौजे रोडपाली, ता. पनवेल, जि. रायगड. येथे मयत झालेली आहे. मयत श्री रामचंद्र बाळू ठाकूर यांच्या वडीलोपार्जित स्वरुपाच्या सामाईक असलेल्या संपादीत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे रोडपाली, ता. पनवेल. जि. रायगड,**
**येथील सिडको संचिका क्र. रोडपाली- १६६**

| अ. नं. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | भूखंडाचे एकूण क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १ | ७१ बी | ४०३ | ० | ०-१८-८ | १४०० |
| २ | २४ | १९५ | ० | ०-३६-४ | |
| ३ | १४ अ | १५९ | १ | ०-४८-६ | |
| ४ | २२ | १५७ | २ | ०-८६-० | |
| ५ | २२ | १४९ | १ | ०-२१-० | |
| ६ | १४ क | १७४ | १ | २-६५-३ | |
| ७ | १४ बी | १५९ | २ | ०-१४-९ | |
| ८ | १५ | १४९ | २ | ०-०९-१ | |
| ९ | २३ | ११७ | ० | १-३१-५ | ११५० |
| | | | एकूण क्षेत्र | ६-३१-६ | २५५० |

वर नमुद केलेल्या मिळकतीबाबत मयत श्री रामचंद्र बाळू ठाकूर व मयत श्रीमती जिजाबाई बाळू ठाकूर हिचे वारसांनी म्हणजेच वर नमुद अर्जदाराने त्यांचे मृत्यूपश्चात अर्जदार व सामनेवाले हेच कायदेशीर वारसदार आहेत अशा आशयाचा वारस दाखला मिळणेसाठी ना. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. सबब अर्जदार श्रीमती भागुबाई कृष्णा टेंभे रा.वलप, ता. पनवेल, जि.रायगड. व सामनेवाले श्री केसरीनाथ रामचंद्र ठाकूर (मयत) तर्फे वारस १/१) श्रीमती जाईबाई केसरीनाथ ठाकूर, वगैरे रा. रोडपाली, ता. पनवेल, जि. रायगड. हे मयत श्री रामचंद्र बाळू ठाकूर व मयत श्रीमती जिजाबाई बाळू ठाकूर यांचे कायदेशीर वारसदार आहेत या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीच्या कोणत्याही प्रकारच्या हरकती असल्यास त्या त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या मे. कोर्टात प्रत्यक्ष कागदपत्रांसह हजर राहून लेखी घ्यावयाच्या आहेत. परंतु मुदतीत हरकती न आल्यास त्याचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. तारीख ६/१२/२०२५.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

ॲड. सुचिता सत्यवान पाटील
अर्जदारतर्फे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथिल मे. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.१६६०/२०२५
नि.नं.८/ड
ने.ता.२७/०१/२०२६

कै. अधिक शामु बनसोडे (मयत) चे वारस
१) श्रीम. प्रतिभा अधिक बनसोडे
वय. ५२, धंदा - शेती
२) कु. स्नेहा अधिक बनसोडे
वय. ३४, धंदा नोकरी
३) श्री. अक्षय अधिक बनसोडे
वय-३३, धंदा नोकरी
रा. रेल्वे फाट्या जवळ, ओम ढाब्याच्या
समोर, पो. रांजणी, ता. कवठेमहाकाळ,
जि. सांगली पीन- ४१६४११ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

ह्या जाहीर नोटीसीने सर्व जनतेस असे कळविणेत येते की, अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडिल कै. अधिक शामु बनसोडे हे दिनांक ०९/११/२०२३ रोजी मौजे-रांजणी, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली येथे मयत झाल्या आहेत. मृत्युसमयी त्यांचे नावे व मालकीचा खालील वर्णनाचा

**मिळकतीचे वर्णन**

मौजे - नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथील पुष्प मंदीर अपार्टमेंट, पहिला मजला, सदनिका नं.-१०२, प्लॉट नं. ७८,७९, सेक्टर-४, ज्याचे क्षेत्र ५५३ चौ. फुट सुपर बिल्टप.

अशा वर्णनाची मिळकत होती व आहे. सदर मिळकती संदर्भात अर्जदारांच्या नावे वारसदाखला मिळावा म्हणुन अर्जदार सदरचा अर्ज दाखल करीत आहते.

सबब कै. अधिक शामु बनसोडे यांच्या वारसाहक्कासंबंधी अन्य कुणासही हरकत घेण्याची असल्यास अशा संबंधीत व्यक्तिंनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासुन ३० दिवसांच्या आंत लेखी हरकती स्वतः अगर वकिलांमार्फत सादर कराव्यात.

सदर नोटीशीच्या मुदतीत अन्य कोणाची हरकत वगैरे न आल्यास आणि अर्जदार यांनी दिलेला पुरावा सिद्ध झाल्यास या अर्जदाराच्या लाभांत वारसदाखला दिला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आभच्या सही निशी व कोर्टाच्या शिक्यानिशी आज तारीख ०९/१२/२०२५ रोजी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

---

मा.साळवी मॅडम कोर्ट

ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.१५५९/२०२५
नि.नं.७/ड
ने.ता.०६/०१/२०२६

कै. कमलाकर दत्तात्रेय म्हात्रे मयतचे वारस
१) श्रीमती. सुमन कमलाकर म्हात्रे
वय - ६७ वर्षे, धंदा-गृहिणी
२) श्री. किरण कमलाकर म्हात्रे
वय- ४८, वर्षे, धंदा- नोकरी,
३) श्री. विरेंद्र कमलाकर म्हात्रे
वय- ४७, वर्षे, धंदा- नोकरी,
रा. विनायकम सोसायटी, प्लॉट नं. ३४/३५/३६,
रूम नं. ३०४, सेक्टर ०५, डी मार्ट जवळ,
नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड
४) श्री. शैलेश कमलाकर म्हात्रे
वय- ४३, वर्षे, धंदा- नोकरी,
५) श्री. विशाल कमलाकर म्हात्रे
वय- ३९, वर्षे, धंदा- नोकरी,
६) श्री. मंदार कमलाकर म्हात्रे
वय - ३७, वर्षे, धंदा- नोकरी,
वरील १व २, ४ ते ६ रा.ए टाईप १०/५, सिडको
कॉलनी, शंकर मंदिर जवळ, सेक्टर १३,
नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीव्दारे असे कळविण्यात येते की, कै.कमलाकर दत्तात्रेय म्हात्रे यांचे दिनांक १६/०७/२०२० रोजी ए टाईप १०/५, सिडको कॉलनी, शंकर मंदिर जवळ, सेक्टर १३, नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. येथे राहत्या घरी निधन झालेले असून श्रीमती. सुमन कमलाकर म्हात्रे, वगैरे हयांनी, कै. कमलाकर दत्तात्रेय म्हात्रे यांच्या स्वकष्टार्जित खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन. १**

ए टाईप १० रूम नं.५, तळ मजला, सिडको कॉलनी,
सेक्टर १३, नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

**मिळकतीचे वर्णन.२**

मौजे-ओवळे, ता. पनवेल, जि. रायगड येथिल
मालमत्ता क. २२ ब, क्षेत्र ४६८ चौ. फुट / चौ.मी.

वरील मिळकत ही, कै. कमलाकर दत्तात्रेय म्हात्रे यांच्या स्वकष्टार्जित मालकीची आहे. श्रीमती. सुमन कमलाकर म्हात्रे, वगैरे हे, कै. कमलाकर दत्तात्रेय म्हात्रे यांचे कायदेशिर वारस आहेत हया हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एका महिन्याच्या आत हया मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधी मध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट श्रीमती. सुमन कमलाकर म्हात्रे, वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर, कै. कमलाकर दत्तात्रेय म्हात्रे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिध्द झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक ०६/१२/ २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**

---

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत सिता काळुराम पाटील व इतर यांच्या मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत मूळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहित असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहेत. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका उरण, मे. दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे वशेणी येथील मिळकत भूमापन/सर्व्हे नं. ११६/८ यांसी एकूण क्षेत्र ००.१३.०० हे. आर. प्र., पोटखराबा ०.०२.०० हे. आर. प्र., यांसी आकार रक्कम रुपये ०.२८ पैसे, यांसी चतुःसीमा वहिवाटीप्रमाणे आहेत.

येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहित दरोबस्त.

रायगड, तारीख : १० डिसेंबर २०२५

**सही/-**
**श्री. विनायक र. ताम्हणकर, वकिल**
**खरेदीदारातर्फे वकिल**
**३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी, शनी नगर,**
**मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३.**
**भ्रमणध्वनी क्र. ८६६८५५१३१२.**

---

Khandare Judge Court

Adv.Vandana

## PUBLIC NOTICE

IN THE COURT CIVIL JUDGE SENIOR DIVISION
PANVEL AT PANVEL

CIVIL M.A. NO. 1339 OF 2025
Exh No.7/D
N.D. 23/12/2025

1.Mrs. INDU BHATIA
W/o Late Neeraj Shankarlal Bhatia
Indian Inhabitant, Age: - 49 years,
Residing at Flat No. 102,
Maruti Dham CHS LTD.,
Plot No. 52, Sector- 20
Ulwe - 410206
2. Mr. DAKSH NEERAJ BHATIA
Indian Inhabitant, Age: - 22 years,
Residing at Flat No. 102,
Maruti Dham CHS LTD.,
Plot No. 52, Sector- 20
Ulwe -410206 Applicants
V/s
Mrs. NANDA SHANKARLAL BHATIA
Indian Inhabitant, Age: - years,
Residing at Flat No. C5/10/4:2,
Ekta Apartment, Sector- 3
CBD Belapur -400614 Respondent

Whereas the above – name Applicants Mr. DAKSH NEERAJ BHATIA and Mr. DAKSH NEERAJ BHATIA (Son of the deceased) the above named Applicants are Legal Heir and representative of the Deceased Late NEERAJ SHANKARLAL BHATIA who died on 24/06/2024 at Millennium Multi specialty Hospital, Plot No. 194, Sector-19, Ulwe -410206. The Applicants has filed the application for the Succession Certificate before this Hon'ble Court for the Property mentioned as under-

LIC Policy Viz Jeevan Saral vide policy no. 925234091 of Rs. 9,67,380/-. (Rs. Nine Lakhs Sixty-Seven Thousand Three Hundred Eighty Only)

If anyone is having objection (except the applicants) then within one month from the date of the paper notice do appear in the Court and give their objection. If there is no objection within one month from the date of the paper publication from any one, then the court will issue succession Certificate in the name of the Applicants i.e. Mrs. INDU BHATIA W/o Late Neeraj Shankarlal Bhatia & Mr. DAKSH NEERAJ BHATIA the legal representatives and Legal Heirs of Deceased Late NEERAJ SHANKARLAL BHATIA the above-named applicant.

GIVEN UNDER MY HAND AND THE SEAL OF THE COURT This 08 Day 12/2025

**SD/-**
**Jr.Clerk**
**Civil Judge S.D.**
**Panvel**

(Court Seal)

**SD/-**
**Asst.Supted.**
**Civil Judge S.D.**
**Panvel**

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे, नवीन पनवेल पूर्व, ता. पनवेल, जि. रायगड, येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क माझे आशिल यांनी कायमस्वरुपी कब्जेदारांकडून हक्कसोड करण्याचे ठरविले आहे. सदर भूखंडाचे वर्णन व विदयमान कब्जेदारांची नावे खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे नवीन पनवेल पूर्व, ता. पनवेल, जि. रायगड**

| सदनिका क्रं. | भोगवटादाराचे नाव | रो हाऊस प्लॉट नं. /सेक्टर | इमारतीचे नाव/सोसायटीचे नाव | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| - | अमर नामदेव पाटील<br>सरस्वती नामदेव पाटील<br>वर्षा वसंत गायकर उर्फ वर्षा नामदेव पाटील | युनिट नं. २५, प्लॉट नं. सी.२० सेक्टर-०६ | सपना को.ऑप. हौ.सो.लि. | ३२.०० चौ.मी. |

वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क माझे अशिलानी वरील भोगवटाधारांकडून कायमस्वरुपी हक्कसोड करून घेण्याचे ठरविले आहे.

वरील मिळकती बाबत अन्य कोणाचाही गहाण, दान, बोजा, बक्षिस, साठेकरार, विकसनकरार, फरोक्त, ट्रस्टी, पोटगी, वारसा, भाडेपट्टा, वहीवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचे दस्ताने कोणत्याही प्रकरचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित आहे, असे समजण्यात येऊन सदरहू मिळकती संदर्भात माझे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. सदर दिलेल्या मुदतीनंतर असलेल्या हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि.०९/१२/२०२५
ठिकाण : नवीन पनवेल

**सही/-**
**ॲड.अमित दशरथ शिरवले**
**ॲडव्होकेट पनवेल**
**शॉप नं. २. गुरुप्रेम सोसायटी, प्लॉट नं. १९,**
**सेक्टर ८, खांदा कॉलनी नवीन पनवेल (प),**
**ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६**
**फोन नं. ९८६७३५२४७८**

---

Adv. Darshana Sapkal
9320232943

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF HON'BLE C. J. S. D
PANVEL, AT PANVEL
CIVIL MISC. APPLICATION NO. 1063 OF 2025
Exh No.8/D

1. MR. PRAVEEN KANT SAHAY
Aged- 63 years, Occupation - OCI
Presently residing at: 20, Lexington
Drive, Acton, MA 01729, USA.
Through his Const. Attorney
MR. HEMANT KANT VINAY
2. MR. PRANAY KANT SAHAY
Aged - 62 years, Occupation - NRI
Presentyl residing at: 2214, Enchanted
Park Lane, Katy, Tx, 77450, USA.
Through his Const. Attorney
MR. HEMANT KANT VINAY
3. MRS. PRERANA SINHA W/O P. R. SINHA
Aged-61 years, Occupation - Professor
Presently residing at: A1 Block 901 Puri
Emerald Bay Sector-104 Dwaraka
Expressway GURUGRAM,
HARYANA 122006 Applicants
V/S
NIL Opponent

The Applicant No. 1 and Applicant No. 2 are son, Applicant No. 3 is daughter of Late. Abhay Kant Sahay who died on 16/04/2021 at Patna, Patna Sadar, Patna, Bihar.

That, Late. Mrs. Shyama Sahay who is wife of deceased Abhay Kant Sahay died on 29th April 2008 at Shyama Bhavan, 402, Patna and Late. Smt. Belmati Devi mother of Late Abhay Kant Sahay died long back.

That, during the lifetime of the Late. Abhay Kant Sahay had entered into various Agreements to sell with Arens Infratech Private Ltd., in respect of five separate plot of land situated at Arens city, Village Vare, Taluka Karjat, Dist- Raigad. Which is as follows:

i) All that piece and parcel of land bearing Survey No. 189, internal Plot No. 11 at Arens City, Vare Village, Taluka Karjat, District Raigad.

ii) All that piece and parcel of land bearing Survey No. 189, internal Plot No. 12 at Arens City, Vare Village, Taluka Karjat, District Raigad.

iii) All that piece and parcel of land bearing Survey No. 189, internal Plot No. 14 at Arens City, Vare Village, Taluka Karjat, District Raigad.

iv) All that piece and parcel of land bearing Survey No. 189, internal Plot No. 15 at Arens City, Vare Village, Taluka Karjat, District Raigad.

v) All that piece and parcel of land bearing Survey No. 189, internal Plot No. 156 at Arens City, Vare Village, Taluka Karjat, District Raigad

Whereas the above named Applicant has filed Misc Application for Heirship Certificate under Bombay Regulation VIII of 1827, the Court of Civil Judge (SD) Panvel, Panvel,.

You the member of Public are hereby given Notice to appear in the Court of Civil Judge (SD) Panvel, At, in person or by pleader duly instructed and to file your say/objection if any within 30 (thirty) days from the date of publication of this public notice. Failing which said application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under hand and seal of the cout this 06 day of 12/2025

**SD/-**
**Jr.Clerk**
**Civil Judge S.D.**
**Panvel**

(Court Seal)

**SD/-**
**Asst.Supted.**
**Civil Judge S.D.**
**Panvel**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# पनवेलच्या बाजारपेठा नाताळ निमित्त सजल्या

**दै.रायगड नगरी | पनवेल**

नाताळ हा सर्ण सर्व जाती-धर्मातील नागरिकांकडून मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. विशेषकरून बच्चे कंपनीमध्ये या सणाचे विशेष आकर्षण असते. अवघ्या काही दिवसांवर नाताळ येऊन ठेपला असल्याने पनवेल परिसरातील विविध ठिकाणच्या बाजारपेठा सजावटीच्या साहित्यांनी सजल्या आहेत. ख्रिसमसनिमित्त होणाऱ्या सेलीब्रेशनची आतापासूनच जय्यत तयारी सुरु झाल्याचे दिसत आहे.

नाताळ जवळ आल्याने शहरांतील बाजारपेठा, दुकाने व मॉल्स ख्रिसमस ट्री, रंगीबेरंगी लाईट्स, बेल्स, स्टार्स, सांताच्या टोप्या, केक, सजावटीच्या वस्तू आदी साहित्यांनी सजल्या आहेत. यानिमित्त बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांची लगबग सुरू असल्याचे दिसून येत आहे.

सध्यास्थितीत बाजारपेठेत सजावटीच्या वस्तूंमध्ये विविध आकारांचे ख्रिसमस ट्री, जिंगल बेल्स, विद्युत माळा (लाईट्स), स्टार्स, टिनसेल, बॉल्स आणि स्टॉकिंग्ज, ख्रिस्त जन्माचे साहित्य, मुखवटे आणि सांताक्लॉजच्या टोप्या दाखल झाल्या आहेत. तसेच खाद्यपदार्थांमध्ये विविध फ्लेवर्सचे केक, विशेषतः प्लम केकचीमागणी जास्त असते.

त्यामुळे हे केक उपलब्ध करून देण्यावर दुकानदारांकडून भर दिला जात आहे. विशेषकरून लहान मुलांसाठी बाजारात सांताक्लॉजसारखे ड्रेस, कानटोपी, ग्लोज, शूज, पोतडी बॅग्जही आल्या आहेत. बच्चे कंपनीत सांताक्लॉजचे खास आकर्षण असल्याने चॉकलेट गिफ्ट घेवून येणाऱ्या सांताक्लॉजचे आकर्षक मुखवटे, टोपी यांची खरेदी आतापासून होतांना दिसत आहे. काही ठिकाणी साहित्याच्या किमतीत वाढ झाली आहे, तरीही उत्साहामुळे खरेदी सुरू असल्याचे दिसून येत आहे.

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. (क) स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.१६०३/२०२५
नि.नं.८
ने.ता.१३/०१/२०२६

१. नामी राघो ठाकरे लग्ना पूर्वीचे नाव
नामी कमळया पारधी मयत तर्फे वारस
१/१. मंगळी सुकीर पारधी मयत तर्फे वारस
१/१/१. श्री. अनंता सुकिर पारधी
वय ३५, वर्षे, धंदा शेती.
१/१/२. सौ. वंदना वामन केवारे
वय - ४९, वर्षे, धंदा शेती
१/१/३. सौ. वनीता राजेश सांबरे
वय - ३२, वर्षे, धंदा शेती
१/१/४. सौ. नामदेव सुकिर पारधी
वय- २९, वर्षे, धंदा शेती
१/१/४. सौ. अलका सुधीर भुतांबरे
वय - ३६, वर्षे, धंदा- शेती
१/१/५. श्री. आत्माराम सुकिर पारधी
वय - ३६, वर्षे, धंदा- शेती
वरील सर्व राहणार मौजे गराडा (नानोशी)
पो. कुंडेवहाल, ता. पनवेल जि. रायगड
२. जनाबाई बुधाजी ठाकरे लग्ना पुर्वीचे नाव
जनाबाई कमळया परधी मयत तर्फे वारस
२/१. आनंता बुधाजी ठाकरे
वय - ३८ वर्षे, धंदा- शेती.
मौजे गराडा (नानोशी) पो. कुंडेवहाल,
ता. पनवेल जि. रायगड.
२/२. कमलाकर बुधाजी ठाकरे.
वय-४६ वर्षे, धंदा- शेती.
मौजे बेलवाडी पो. कुंडेवहाल, ता. पनवेल जि. रायगड.
२/३. जयश्री सुकऱ्या वाघ.
वय - ३७ वर्षे, धंदा- शेती.
मौजे वाघाचीवाडी, ता. पनवेल, जि. रायगड.
३. जनी कमळू वाघ लग्ना पुर्वीचे नाव
जनी कमळया परधी
वय - ७० वर्षे, धंदा- शेती
मौजे वाघाचीवाडी, पो. वाजे, ता. पनवेल जि. रायगड.
४. बुध्या कमळया दरवडा उर्फ पारधी
वय- ५७ वर्षे, धंदा- शेती
मौजे गराडा (नानोशी) पो. कुंडेवहाल ता. पनवेल जि. रायगड.
५. सोनाबाई नारायण शिंगवा लग्ना पुर्वीचे नाव
सोनाबाई कमळया परधी मयत तर्फे वारस
५/१. शेवंता मंगळया उघडा
वय - ४७ वर्षे, धंदा- शेती
रा. सारसई पो. आपटा, ता. पनवेल. जि. रायगड
५/२. बेबी शिमग्या विर
वय - ६८ वर्षे, धंदा- शेती
रा. रानसई, पो. चिरनेर, ता. पनेवल. जि. रायगड
५/३. बुध्दी नंदू निरगुडा
वय- ४४ वर्षे, धंदा- शेती
रा. धोदाणी पो. वाजे. ता. पनवेल जि. रायगड
५/४. हिरी रामदास लेंढे
वय - ४१ वर्षे, धंदा- शेती
राः रानसई, पो. चिरनेर, ता. पनेवल जि. रायगड
५/५. अनु नामदेव भगत
वय - ६२ वर्षे, धंदा- शेती
मु. रानसई, पो. चिरनेर, ता. पनेवल जि. रायगड
५/६. सुकरी पदमाकर वीर
वय- ४९ वर्षे, धंदा- शेती
मु. खोंडयाचीवाडी रानसई,
पो. चिरनेर, ता. पनेवल. जि. रायगड — अर्जदार

विरूध्द

१. गोमा कमळया पारधी उर्फ दरवडा
वय- सज्ञान वर्षे, धंदा शेती
२. आंबो कमळया पारधी उर्फ दरवडा
वय- सज्ञान वर्षे, धंदा शेती
मौजे गराडा (नानोशी) पो. कुंडेवहाल
ता. पनवेल जि. रायगड — सामनेवाला

या जाहीर नोटीसीदवारे सर्व जनतेस कळविणेत येत आहे की, मयत व्यक्तीसी नाते वरील अर्जदार १/१/१ ते १/१/६ पंतु, अर्जदार २/१ ते २/३ नातु, अर्जदार ३ मुलगी, अर्जदार ४ मुलगा, अर्जदार ५/१ ते ५/६ नातु व सामनेवाले १ ते २ मुले आहेत. सदर मिळकतीचे अर्जदार व सामनेवाला कायदेशीर वारस आहेत. इतर कोणीही सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीर वारस नाहीत. कै. कमळया रामा पारधी यांचा मृत्यू दिनांक १३/०४/२००५ रोजी मौजे गराडा (नानोशी) पो. कुंडेवहाळ ता. पनेवल जि. रायगड येथे झाला आहे. अर्जदार १/१/१ ते ५/६ आणि सामनेवाला १ ते २ हे यांचे कायदेशीर वारस आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

सर्व्हे नं. १८/०, २०/०, ३५/०, ३६/०
मौजे नानोशी, ता. पनवेल, जि. रायगड

